# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सामान्य प्रशासन विभाग)

क्रमांक :- उपायुक्त(साप्रवि)/९८७२/२०२०
दिनांक :- १४.०८.२०२०

आदेश :-

वाचा :-

१. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम २०२०, दि. १४.०३.२०२०
२. महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दि. २९.०७.२०२०
३. या कार्यालयाचे आदेश क्र. एमसी/१५१/२०२०, दि. ३०.०७.२०२०

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुने (कोव्हीड-१९) उदभवणाऱ्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र कोव्हीड-१९, उपाययोजना नियम २०२० यातील नियम ३ नुसार शहरी भागात आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे व त्यांना कार्यक्षेत्रातील कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे जाहीर केले आहे.

ज्याअर्थी, उक्तप्रमाणे नियम १० अन्वये आयुक्त, महानगरपालिका यांना (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, काही प्रकरणांच्या अभ्यासावरून असे निदर्शनास आले आहे की, सामाजिक अंतर (Social Distacing) ठेवल्यास एकमेकांशी संपर्क साधणाऱ्या व्यक्तीकडून कोरोना विषाणुंचा प्रसार कमी होण्यास मदत होते.

ज्याअर्थी, संदर्भिय आदेश क्र. २ अन्वये मोठा जमाव करण्यास मनाई करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, नागपूर शहरात दरवर्षी मारबत व पोळा सण विविध ठिकाणी मोठया प्रमाणात साजरा करण्यात येवून यात खुप मोठया प्रमाणात गर्दी होत असून अशा गर्दीत सामाजिक अंतर (Social Distancing) ठेवणे अतिशय कठीण असल्याने, यामुळे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव / प्रसार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्याअर्थी, मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, लोकहिताच्या दृष्टीने व नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याच्या हितास्तव कोरोना विषाणूंचा प्रसार टाळण्यासाठी गर्दी निर्माण करणारे कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक कार्यक्रम, सार्वजनिक ठिकाणी साजरे करण्यास प्रतिबंध घालणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी तुकाराम मुंढे, आयुक्त महानगरपालिका, नागपूर या कायद्याच्या नियम १० अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून कोरोना विषाणूंचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

१. दिनांक १८ ऑगस्ट, २०२० रोजी साजरा होणारा बैल पोळा व दिनांक १९ ऑगस्ट २०२० रोजी साजरा करण्यात येणारा तान्हा पोळा किंवा मागीलपुढील इतर दिवशी साजरा होईल त्यासही, हा सण नागपूर शहरातील सार्वजनिक ठिकाणी तसेच सामुहिक स्वरुपात साजरे करणेस प्रतिबंध घालण्यात येत आहे.

२. दिनांक १९ ऑगस्ट, २०२० रोजी किंवा मागीलपुढील इतर दिवशी साजरा होणारा मारबतीचा कार्यक्रम व मिरवणुक नागपूर शहरातील सार्वजनिक ठिकाणी तसेच सामुहिक स्वरुपात साजरे करणेस प्रतिबंध घालण्यात येत आहे.

३. मारबत दहनाचा कार्यक्रम टाळण्यात यावा, असे दहन करणे परंपरेनुसार आवश्यक असल्यास तो साजरा करतांना पाच पेक्षा जास्त नसेल इतक्या व्यक्तींच्या उपस्थितीत सामाजिक अंतर (Social Distacing) ठेवून व चेहऱ्यावर त्रिस्तरीय मास्क (३ Ply Mask) किंवा कापडी मास्क परिधान करून या कार्यालयाची तसेच पोलीस अधिकाऱ्यांची पुर्व अनुमती प्राप्त करुन नियमानुसार साजरा करता येईल.

४. कोणताही सार्वजनिक कार्यक्रम, सार्वजनिक ठिकाणी साजरा करणेस प्रतिबंध असल्यामुळे नागरिकांनी आवश्यकता असल्यास निकडीनुसार घरीच सण साजरा करावा.

उपरोक्त नमूद आदेशाचे ततोतंत पालन करावे तसेच नमूद निर्देशाचे कुणाकडूनही उल्लंघन झाल्यास ते सर्व संबंधित भारतीय दंड संहिता कलम १८८ व इतर अनुषंगीक कायद्यान्वये कारवाईस पात्र ठरतील.

पोलिस आयुक्त, नागपूर शहर, नागपूर यांनी नमूद आदेशाचे अनुषंगाने आपले अधिनस्त पोलिस अधिकाऱ्यांना आवश्यक सुचना देवून सदर आदेशाचे पालन होईल याची उचित दक्षता घ्यावी.

तुकाराम मुंढे (भा.प्र.से.)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी आवश्यक कार्यवाहीस्तव :-

१. पोलिस आयुक्त, नागपूर शहर, नागपूर
२. अति. आयुक्त (सामान्य/शहर/सेवा) महानगरपालिका, नागपूर
३. सहाय्यक आयुक्त, झोन क्र. १ ते १० यांना उपरोक्तप्रमाणे आवश्यक पर्यवेक्षण व अनुषंगीक कार्यवाहीस्तव.

प्रतिलिपी माहितीस्तव:-

१. मा. महापौर/उपमहापौर/स्थायी समिती सभापती/सत्तापक्ष नेता/विरोधी पक्ष नेता, म.न.पा. नागपूर
२. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. जिल्हाधिकारी, नागपूर